जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :- २१ नोव्हेंबर २०२३

जळगाव. दि.२१ (प्रतिनिधी) पुढील शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू केले जाणार असून या अंतर्गत चार वर्षीय अभ्यासक्रमाची माहिती सर्व घटकांना व्हावी यासाठी विद्यापीठात शुक्रवार दि. १ डिसेंबर २०२३ रोजी अधिसभा सदस्य, प्राचार्य, संस्थाचालक यांची बैठक आयोजित करण्यात आली आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्यात येत आहे. महाविद्यालयांमध्ये हे धोरण सन २०२४-२५ पासून लागू केले जाणार आहे. याबाबत विद्यापीठाने आजपर्यंत केलेली कार्यवाही, चार वर्षीय अभ्यासक्रमाची सर्वसाधारण माहिती सर्व घटकांना व्हावी म्हणून १ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात बैठक होणार आहे. या बैठकीसाठी सर्व अधिसभा सदस्य, प्राचार्य/संचालक, संस्थाचालक (अध्यक्ष / सचिव), यांना निमंत्रित करण्यात आले आहे. कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी हे संवाद साधणार आहेत अशी माहिती कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी